follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

२५ वर्षे विश्वासार्हतेची

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.७२१०५/९९ * वर्ष २५ * अंक ३०३ सातारा * सोमवार दि २९ जुलै २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/



## मनू भाकरची पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदकाला गवसणी

**मुंबई :** ऑलिम्पिकमध्ये नेमबाजीत पदक पटकविणारी ठरली देशातील पहिली महिला खेळाडू भारताची युवा नेमबाज मनू भाकरने (दि.२८) पॅरिस ऑलिम्पिकमध्ये १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात तिने कांस्य पदकावर आपली मोहर उमटवली.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल नेमबाजी प्रकारात मनू भाकरने अंतिम फेरीत धडक मारली. पात्रता स्पर्धेत तिने ५८०-२७ गुणांसह तिसरे स्थान पटकावले होते. अंतिम सामन्यात सुरुवातीपासून तिने अचूक लक्ष्य साधले. आज तिच्या कामगिरीत अचूकता आणि दृढनिश्चय याचे मिश्रण दिसून आले. पाच शॉट्सच्या पहिल्या राउंडला ५०.४ शूट करून दुसरे स्थान पटकावले..तिसर्या राउंडमध्ये तिने प्रत्येकी ५ शॉट्सच्या दोन मालिकेनंतर एकूण १००.३ अंकांसह मनू तिसर्या स्थानवर राहिली. फायनलमध्ये २० शॉट्सनंतर, मनू भाकरने २०१.३ गुण मिळवत पदक निश्चित केले. त्याबरोबर या स्पर्धेमध्ये कोरियाच्या ओ ये जिनने वीस शॉट्समध्ये २४३.२ गुण मिळवून या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. त्यापाठोपाठ कोरियाच्याच किम येजीने वीस शॉट्समध्ये २४१.३ गुण मिळवत रौप्यपदक जिंकले.

तुम्ही फक्त कर्म करत राहा...मी दररोज भगवद्गीतेचे वाचन करते. तुम्ही फक्त कर्म करत राहावा, फळाची अपेक्षा करु नका, असे भगवाग कृष्णांची शिकवण आहे. याच शिकवणीवर मी नेमबाजीचा सराव केला. आज त्याचे फळ मिळाले. देशवासीयांच्या पाठिंबा आणि कुटुंबीयांच्या प्रोत्साहानामुळेच मला हे यश मिळाले, अशी प्रतिक्रिया मनू भाकरने पदक पटकावल्यानंतर दिली.

**अपयश हीच यशाची पहिली पायरी**

२२ वर्षीय मनू भाकर ही मूळची हरियाणातील झज्जर येथील टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत मनूला अपेक्षित कामगिरी करता आली नव्हती. ऐन स्पर्धेवेळी तिची पिस्तुल खराब झाली होती. तिचे २० मिनिटे वाया गेली. यामुळे ती अंतिम फेरीपूर्वीच बाहेर पडली होती. या अपयशाने मनू थोडी खचली होती. मात्र तिला तिच्या कुटुंबीयांची भक्कम साथ लाभली. अपयश हीच यशाची पहिली पायरी मानत तिने पॅरिस ऑलिम्पिकसाठी प्रचंड परिश्रम घेतले. आपल्या दृढनिश्चियाच्या जोरावर तिने जोरदार पुनरागमन करत अंतिम फेरीत धडक मारली होती. कोट्यवधी भारतीयांच्या आशा मनू भाकरच्या कामगिरीकडे लागल्या होत्या. मनूही टोकियो ऑलिम्पिकमधील अपयश धूवून काढत ... पदकाला गवसणी घातली. नेमबाजीत पदक पटकविणारी ती पहिली भारतीय महिला ठरली आहे.



**भारताची नेमबाज मनू भाकरने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये इतिहास घडवला. १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात तिने कांस्य पदक मिळवले. ऑलिम्पिकमध्ये पदक पटकविणारी ती देशाची पहिली नेमबाज ठरली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मनू भाकर हिचे 'मनू तुझं यश अविश्वसनीय' असे म्हणत तिचे अभिनंदन केले आहे.**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'ऐतिहासिक पदक! खूप छान, पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये भारताने पहिले पदक जिंकले. कांस्यपदकासाठी तुझे अभिनंदन. हे यश आणखी खास आहे, कारण ती भारतासाठी नेमबाजीत पदक जिंकणारी पहिली महिला ठरली आहे. हे यश अविश्वसनीय यश असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.**



## खडकवासला धरणातून पुन्हा पाण्याचा विसर्ग

**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून पुणेजिल्ह्यात चांगला पाऊस होत असून, धरणसाठादेखील वाढला आहे. शहराला टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला या चार धरणांमधून पाणीपुरवठा केला जातो. या धरण साखळीत रविवारी (दि. २८) तब्बल २४.९५ टीएमसी पाणीसाठा झाला. त्यामुळे खडकवासला धरणातून पाच हजार क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला.


धरणांच्या पाणलोट क्षेत्रात जुलैअखेर दमदारपाऊसहोत आहे. त्यामुळे शहराला पिण्याच्या पाण्याची सोय झाली आहे. तसेच ग्रामीण भागाला शेतीसाठी मुबलक पाणी उपलब्ध झाले आहे. या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात होणाऱ्या पावसामुळे चारही धरणे भरली असून, धरणांतून विसर्ग केला जात आहे. खडकवासला धरण साखळीची पाणीसाठा क्षमता २९ टीएमसी आहे. आतापर्यंत २४.९५ टीएमसी साठा झाला आहे. त्यामुळे पुणेकरांची पाण्याची चिंता मिटली आहे.

जून महिन्यात पावसाने ओढ दिली होती. पण जुलैच्या मध्यानंतर दमदार पाऊस झाला आणि धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाणीसाठा होऊ लागला. गेल्या चार-पाच दिवसांपासून धरण परिसरात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे खडकवासला धरण साखळीत चांगला पाणीसाठा झाला आहे.

पानशेत धरणातून पहिल्यांदाच रविवारी दुपारी १ वाजता ४,७१२ क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला.धरणांच्या परिसरात संततधार कायम असून, रविवारी खडकवासलामधून पुन्हा विसर्ग सोडण्यात आला. धरण क्षेत्रातील पावसाचे प्रमाण पाहून विसर्ग कमी-जास्त केला जाणार असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले

खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीपात्रात होणारा विसर्ग वाढवून आज रात्री १२.०० वा. १३ हजार ९८१ क्यूसेक करण्यात येणार आहे. पावसाच्या प्रमाणानुसार विसर्ग कमी/जास्त करण्याची शक्यता आहे. खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीपात्रामध्ये सुरू असणारा ५१३६ क्युसेक विसर्ग वाढवून २८ जुलै रोजी रात्री ८ वाजता ७७०४ क्युसेक करण्यात आला. पानशेत धरणातूनदेखील रविवारी दुपारी ४७१२ क्युसेक विसर्ग सोडण्यात आला.

## दिल्लीत आयएएस अकॅडमीच्या तळघरात तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू



**नवी दिल्ली :** दिल्लीतील राजेंद्र नगर येथील राव आयएएस अकॅडमीच्या तळघरात मुसळधार पावसामुळे पाणी भरल्यामुळे तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर, भाजपा आणि आपमध्ये आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडू लागल्या आहेत. प्रत्यक्षदर्शीने या अपघाताबद्दल दिलेल्या माहितीनुसार, 'बायोमेट्रिक राव आयएएस अकॅडमीच्या तळघरात आहे. अंगठ्याचे प्रिंट न देता अकॅडमीच्या बाहेर पडता येत नाही. पावसामुळे बायोमॅट्रिक मशीन खराब झाली असावे. त्यामुळे त्यांना अंगठ्याची प्रिंट देता आली नाही. त्यामुळे ते बाहेर पडू शकले नाहीत. 'या अपघातासाठी प्रशासन जबाबदार आहे. इथले सध्याचे आमदार आणि खासदार एकमेकांवर आरोप करत आहेत.

डीसीपी सेंट्रल एम हर्षवर्धन म्हणाले की, आम्ही या प्रकरणात गुन्हा नोंदवून घेतला आहे. आमचे फॉरेन्सिक पथकही पोहचले आहे. फॉरेन्सिक चाचण्या सुरू असून आम्हाला केस दाखल करण्यासाठी एक मजबूत पुरावा हवा आहे.

राजेंद्र नगरच्या घटनेवर आपचे आमदार दुर्गेश पाठक म्हणाले, हे एक लहान क्षेत्र आहे. या ठिकाणी गटारांमधून पाणी वाहते. जर कोणतेही गटार तुटलेले किंवा लीक असल्यामुळे बेसमेंटमध्ये पाणी भरले. बचाव पथक त्यांचे काम करत आहे. पण भाजपने सांगावे याठिकाणी त्यांचा आमदार असूनही त्यांनी आजपर्यंत इथे नाले दुरुस्त का करून घेतले नाही.या घटनेवर भाजपचे खासदार बासरी स्वराज म्हणाल्या, ही मुले त्यांचे भविष्य घेण्यासाठी येथे आली होती पण दिल्ली सरकारने स्थानिक लोकांचे ऐकले नाही. आमदारांना नाले स्वच्छ करण्यास सांगण्यात आले होते, पण त्यांनी नालेसफाई केली नाही.

## बच्चू कडूंची शेतकरी आघाडीची घोषणा; जरांगे पाटील यांना खुलं आमंत्रण

**नागपूर :** राज्यामध्ये लवकरच विधानसभा निवडणूकीचं बिगुल वाजणार आहे. त्यामुळे सर्वच पक्ष तयारीला लागले असून मोर्चेबांधणी सुरु आहे. यंदाची लढाई प्रतिष्ठेची आणि वर्चस्वाची ठरणार आहे. राष्ट्रवादी व शिवसेना या पक्षामध्ये झालेल्या फुटीनंतर ही विधानसभा निवडणूक निर्णायक ठरणार आहे. त्यामुळे महायुती व महाविकास आघाडी जोरदार प्रयत्न करत आहे. दरम्यान, प्रहार संघटनेचे नेते आमदार बच्चू कडू यांनी राज्यामध्ये नवीन आघाडीची घोषणा केली आहे. निवडणूकीमध्ये तिसरी आघाडी नाही तर शेतकऱ्यांची आघाडी असणार आहे असे सूचक विधान बच्चू कडू यांनी केले आहे. बच्चू कडू हे सध्या एकनाथ शिंदे यांना पाठिंबा देत महायुतीमध्ये सामील आहे. मात्र लोकसभेच्या निवडणूकींआधीपासून त्यांचे महायुतीमध्ये नाराजीनाट्य सुरु आहे.

**काय म्हणाले बच्चू कडू?**

प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी केलेल्या शेतकरी आघाडीमुळे यंदाची विधानसभा गाजणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. बच्चू कडू म्हणाले की, येत्या विधानसभा निवडणुकीत आमची तिसरी आघाडी नाही, तर शेतकऱ्यांची आघाडी असेल.



कष्टकरी, शेतकरी जे जास्त कष्ट करतात त्यांची ही आघाडी असेल. ९ ऑगस्टला संभाजीनगर येथे आम्ही सभा ठेवली आहे. त्यात आम्ही आमची भूमिका स्पष्ट करू. मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांना शेतकरी आघाडीत यायचं असेल, तर त्याचं स्वागत आहे. आरक्षण आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सारखेच आहे, असे मत बच्चू कडू यांनी मांडले आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळामध्ये चर्चांना उधाण आले आहे.

प्रहारचे नेते बच्चू कडू हे सध्या महायुतीमध्ये आहेत. मात्र त्यांचे आघाडीमध्ये खटके उडत आहे. आपली नाराजी देखील त्यांनी उघडपणे जाहीर देखील केली आहे. लोकसभेमध्ये अमरावतीच्या जागेवरुन भाजप विरुद्ध बच्चू कडू अशी परिस्थिती देखील निर्माण झाली होती.

नवनीत राणा यांना भाजपने उमेदवारी दिल्याने बच्चू कडू नाराज होते. त्यामुळे आता आगामी विधानसभेमध्ये महायुतीमधून एक्झिट घेत नवीन आघाडी स्थापन करण्याचे संकेत बच्चू कडू यांनी दिले आहेत. शेतकरी, कष्टकरी, मजूर आणि दिव्यांग यांच्या समस्यांवर काही मुद्दे मांडत होतो. त्यासाठी १० ते १५ आमदार एकत्र आले. परंतु सत्ताधाऱ्यांकडे यावर चर्चा करण्यासाठी वेळ नाही यावेळी मुख्यमंत्री कसा प्रतिसाद देतात ते पाहून निर्णय घेऊ. मुख्यमंत्र्यांनी दिलेला प्रतिसाद पटला नाही तर पुढच्या निर्णयासाठी शेतकरी आणि लोकांसमोर जाऊ, अशी भूमिका यापूर्वी बच्चू कडू यांनी घेतली आहे.

त्यामुळे लवकरच राज्यात तिसरी शेतकऱ्यांची आघाडी बघायला मिळू शकते. यामध्ये मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील सामील झाले तर या आघाडीचा आणखी ताकद मिळणार आहे.

## उत्तर-पश्चिम भारतात मान्सूनचा जोर वाढणार

**मुंबई :** मागील काही दिवसांपासून पश्चिम किनारपट्टीवर मान्सून सक्रिय होता. त्यामुळे पश्चिम किनारपट्टीवर व लगतच्या राज्यात अतिवृष्टीसह मुसळधार पाऊस सुरूच होता. परिणामी काही नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली. अनेक भागात पूरपस्थिती निर्माण झाली. दरम्यान हवामान विभागाने पुढील ४ ते ५ दिवसांतउत्तर-पश्चिम (वायव्य) भारतात पुन्हा एकदा मान्सून सक्रीयहोणार असून मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. हवामान विभागाने दिलेल्या बुलेटीनमध्ये म्हटले आहे की, पुढील ४ ते ५ दिवसांत उत्तर-पश्चिम भारताच्या बहुतांश भागात सक्रिय मान्सूनची स्थिती संभवते. रविवार २८ जुलै रोजी संपूर्ण मध्य प्रदेश, विदर्भ, रविवार २८ आणि सोमवार २९ जुलै, २९ रोजी संपूर्ण गुजरात, २९ जुलै रोजी सौराष्ट्र व कच्छ तसेच रविवार २८ जुलै ते गुरूवार १ ऑगस्ट रोजी कोकण, मध्य महाराष्ट्र आणि गोव्यामधील काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.

## धनंजय मुंडेंना राष्ट्रवादीत घेणं हा आमचा आत्मघातकी प्लॅन : जयंत पाटलांचा गौप्यस्फोट

**बीड :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते आणि राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्याबद्दल खळबळजनक विधान केलं आहे. पंधरा वर्षांपूर्वी धनंजय मुंडे यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये घेणे हा आमचा आत्मघातकी प्लॅन होता, असे म्हटलं आहे. जयंत पाटील यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळामध्ये चर्चांना उधाण आलं आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जयंत पाटील हे राज्याच्या दौऱ्यावर



आहेत. अशातच जयंत पाटील हे शनिवारी (२७ जुलै) बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात जयंत पाटील यांनी विधानसभा निवडणुकीसाठी इच्छूक असणाऱ्या सदस्यांची बैठक घेतली. बैठकीनंतर जयंत पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार निशाणा साधला.

यावेळी धनंजय मुंडे यांना पाठवून अजित पवारांना भाजपमध्ये आणण्याचा प्लॅन भाजप आणि आरएसएसचा होता का? असे विचारले असता जयंत पाटील म्हणाले की, गोपीनाथ मुंडे साहेबांनी भाजप सध्या जे राजकारण करत आहे, असे राजकारण कधीच केले नाही. तो आमचाच आत्मघातकी आमचा प्लॅन होता, असे जयंत पाटील यांनी म्हटले. त्यामुळं धनंजय मुंडेंच्या तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशाची चर्चा पुन्हा एकदा रंगली आहे.

याचबरोबर, जयंत पाटील यांनी अजित पवार यांच्यावर देखील निशाणा साधला आहे. ते म्हणाले की, ''राज्य सरकारनं लाडकी बहीण योजनेसाठी ३५ कोटींची तरतूद केली असल्याची माहिती अजित पवार यांनी ट्विट करत दिली. परंतु हे ट्विट अजित पवार यांनी केलं नाही. त्यांना बळजबरीने करायला लावलं आहे. डॉन चित्रपटात बच्चनच्या पिस्तूलमध्ये गोळी नव्हती हे फक्त अभिनेत्रीलाच माहीत होते. तशी गत लाडकी बहीण योजनेची आहे, असा टोला जयंत पाटील यांनी अजित पवारांना लगावला आहे.

## राजकीय पक्षांनी ओबीसी आरक्षणाविषयी भूमिका स्पष्ट करावी : प्रकाश आंबेडकर

**परंडा :** वंचित बहुजन आघाडीच्या वतीने राज्यभर एससी, एसटी, ओबीसी बचाव यात्रा 'वंचित'चे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाखाली काढण्यात येत आहे. ही यात्रा रविवारी (दि.२८) मराठवाड्याचे प्रवेशद्वार धाराशिव येथे आली. यावेळी ओबीसी आरक्षणाबद्दल राजकीय पक्षांनी आपली भूमिका व्यक्त करावी, असे म्हणत आंबेडकर यांनी सत्ताधारी इतर राजकीय पक्षांचा मराठा व ओबीसी आरक्षणावरुन चांगलाच समाचार घेतला.

प्रकाश आंबेडकरयावेळी बोलताना ते म्हणाले, ही यात्रा ओबीसीचे शंभर आमदार निवडून आणण्यासाठीच आहे. जर तुम्ही तुमच्या पक्षातून ओबीसीचे शंभर उमेदवार विधानसभेत निवडून आणलात तर आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ, असे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच



लोकसभेपासून इतर पक्षाची मानसिकता लक्षात येत आहे. हे सगळे पक्ष एससी, एसटी, ओबीसी यांना आरक्षण असल्यामुळे राजकीय आरक्षणपोटी निवडणुकीला उभे करतात. जर आरक्षण नसते, या संबंधितांना डावलण्याची मानसिकता या सर्व राजकीय पक्षांची असल्याचे सांगितले.राजकारणात ताजेपणा आणण्यासाठी संभाजीराजेंनी पुढाकार घ्यावा : प्रकाश आंबेडकरजरांगे पाटील यांची भुमिका मराठयांना ओबीसीतून आरक्षण मिळावे, अशी आहे. तर मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण द्या, आमच्या ताटातील देऊ नका, अशी ओबीसीची भूमिका आहे. पण याबाबत राजकीय पक्षाची काय भुमिका आहे, ती स्पष्ट झालेली नाही. उद्धव ठाकरे, शरद पवार, बाळासाहेब थोरात, देवेंद्र फडवणीस यांनी आपली भुमिका स्पष्ट करावी, असे आवाहन आंबेडकर यांनी यावेळी केले.संभाजीराजे-प्रकाश आंबेडकर एकाच व्यासपीठावर! राजकीय अर्थ काय ?राजकीय पक्ष तुम्हाला झुलवत आहेत. ओबीसीला स्वतःचे आरक्षण वाचण्यासाठी लढा उभारावा लागणार असून जरांगे व देवेंद्र फडणवीस यांचे भांडण हे खोटे आहे, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

# २०१९ नंतर पहिल्यांदाच निरा नदीला मोठ्या प्रमाणात पाणी



**अकलूज :** सन २०१९ नंतर प्रथमच अकलूजच्या निरा नदीला प्रचंड पाणी आले आहे. त्यामुळे अकलूज व परिसरातील नागरिकांनी पाणी पाहण्यासाठी गर्दी केली आहे. तुडुंब भरलेली निरा नदी अकलूजच्या किल्ल्यापासून चंद्राकार वळण घेत पुढे नरसिंहपुर येथे भीमा नदीशी संगम होतो.

पुणे परिसरातील धरण क्षेत्रांमध्ये जोरदार पाऊस झाल्याने गुंजवणी व वीर धरणातून निरा नदीला पाणी सोडण्यात येत आहे. गुरुवारी (दि.२५) सकाळी अकरा वाजता वीर धरणातून ४ हजार ६३७ क्युसेकचा विसर्ग निरा नदीमध्ये सोडण्यात आला. त्यानंतर त्याच दिवशी तो वाढवून १३ हजार ९११ क्युसेक, दुपारी एक वाजता २३ हजार १८५ क्युसेक, गुंजवणीतून ४ हजार ३६९ क्युसेक, दुपारी १ वा. ३० मि. ३२ जार ४५९ क्युसेक, गुंजवणीमधून ४ हजार ३६९ क्युसेक, दुपारी सव्वादोन वाजता वीरमधून ५१ हजार ७३३ क्युसेक, दुपारी पावणेतीन वाजता विसर्ग वाढवून तो ५५ हजार ६४४ क्युसेक करण्यात आला.

याच दिवशी संध्याकाळी सव्वासात वाजता ६१ हजार ४८८ क्युसेक एवढा विसर्ग वाढवण्यात आल्याने निरा नदीला प्रचंड पाणी आले.

नदी किनाऱ्यावरील नागरिकांनी सतर्क राहण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या होत्या. त्यानंतर शुक्रवारी (दि.२६) पावणेपाच वाजता विसर्ग कमी करून तो ५५ हजार ६४४ क्युसेक करण्यात आला.

सव्वा पाच वाजता ४१ हजार ७३३ क्युसेक पाणी निरा नदीमध्ये सोडण्यात आले. तर साडेपाच वाजता विसर्ग आणखी कमी करून तो ३२ हजार ४५९ क्युसेक एवढा करण्यात आला.

# कोल्हापूर शहर आणि करवीर तालुक्यातील शाळा - महाविद्यालयांना आजही सुट्टी

**कोल्हापूर :** शहरासह जिल्ह्यात अनेक भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. कोल्हापूर शहरातील पूर कमी होण्यास सुरवात झाली असली तरी अनेक रस्ते बंद असल्याने शुक्रवार आणि शनिवारी जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालयांना सुट्ट्या दिल्या होत्या. आता सोमवारी आज कोल्हापूर शहर आणि करवीर तालुक्यातील सर्व शाळा-महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी रविवारी रात्री काढले. शिरोळ तालुक्यातील नऊ शाळांत निवारा केंद्र सुरू केल्याने या शाळांनाही सोमवारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. कोल्हापूर शहरासह करवीर तालुक्यातील अनेक मार्गावर अद्याप पाणी आहे. शहरासह करवीर तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालये बंद ठेवणे उचित होईल, असा अहवाल करवीरचे प्रांताधिकारी हरीष धार्मिक यांनी दिला होता. त्यानूसार जिल्हाधिकारी यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ नूसार करवीर तालुक्यातील आणि कोल्हापूर महापालिका क्षेत्रासह सर्व अंगणवाडी, सर्व सरकारी व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका, अनुदानित व विना अनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, सर्व महाविद्यालये, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्थेमधील सर्व विद्यार्थ्यांना सुट्टी घोषित केली आहे.

शिरोळ तालुक्यातील या नऊ शाळाशिरोळ तालुक्यातील श्री. दत्त कनिष्ठ महाविद्यालय, कुरुंदवाड, तेरवाड आश्रमशाळा ,एस.पी. हायस्कूल, कुरुंदवाड , एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड , चंद्रकला बालक मंदिर, कुरुंदवाड, सैनिकी पॅटर्न शाळा, कुरुंदवाड , कुमार विद्या मंदिर, जि.प. शाळा अकिवाट, जिल्हा परीषद प्राथमिक शाळा, तेरवाड, जिल्हा परिषद विद्यामंदिर, धरणगुत्ती या नऊ शाळांत पूरबाधीत नागरीकांसाठी निवारा केंद्र तयार केले आहे. यामुळे या शाळाही सोमवारी बंद ठेवण्यात येणार आहेत. नेकनूर : शाळेचा रस्ता खराब म्हणून विद्यार्थ्यांनी ग्रामपंचायतीमध्येच भरवली शाळा!सोमवारी कोल्हापूर शहर, करवीर तालुका आणि शिरोळ मधील नऊ शाळा-महाविद्यालयांना सुट्टी दिली असली तरी या कालावधीत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित रहावे लागणार आहे. त्यांनी स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाज करावे असेही आदेशात स्पष्ट केले आहे.

## कृष्णा नदीत मायलेकींची आत्महत्या

**सातारा :** वडूथ ता.सातारा येथील कृष्णा नदीच्या पुलावरून राऊतवाडी येथील विवाहित महिलेने दोन वर्षांच्या मुलीसह आत्महत्या केल्याची घटना घडली.

सविस्तर वृत्त असे की येथील संचिता यांचा विवाह राऊतवाडी ता.वाई येथील अमर साळुंखे यांच्याशी झाला होता. संचिता साळुंखे या तीन दिवसांपूर्वी मुलीसह माहेरी वडूथ येथे आल्या होत्या. परंतु शनिवारी पहाटे सहाच्या सुमारास त्या व त्यांची मुलगी या घरातून न सांगता बाहेर पडल्या यावेळी त्यांनी सातारा-लोणंद मार्गावर असलेल्या कृष्णा नदीच्या पुलावरून आपल्या मुलीसह नदीत उडी मारून आत्महत्या केली. या घटनेत दोन वर्षांच्या चिमुरडीसह आईचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे सर्व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. घटनेतील मुलीचा मृतदेह सापडला असून संचिता साळुंखे यांचा मृतदेह संध्याकाळपर्यंत सापडला नव्हता.

पुढील तपास सातारा तालुका पोलीस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.

# घाटातून प्रवास करताय... काळजी घ्या !

**सातारा :** सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात गेल्या चार दिवसांपासून पावसाचा जोर वाढला आहे. या पावसामुळे घाटात दरडी कोसळण्याच्या घटना वाढू लागल्या असून, वाहनधारकांनी घाटातून प्रवास करताना सुरक्षिततेची पुरेपूर काळजी घेणे गरजेचे बनले आहे.

जिल्ह्यात मान्सूनने पाठ फिरवली होती. केवळ धरण क्षेत्रातच पावसाची रिपरिप सुरू होती. मात्र, चार दिवसांपासून पावसाने जिल्ह्याचा पश्चिम भाग व्यापून घेतला असून, जावळी, महाबळेश्वर, वाई, सातारा, कऱ्हाड व पाटण या तालुक्यांना अक्षरशः झोडपून काढले आहे. पावसामुळे डोंगरी भागातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असताना, आता घाटमार्गातील वाहतूकही धोक्याची ठरू लागली आहे. कारण, अती पावसामुळे घाटांमध्ये दरडींचे सत्र सुरू झाले आहे. शिवाय पाण्याबरोबर डोंगरावरील लहान दगडही रस्त्यावर वाहून येऊ लागले आहेत. पाऊस, धुके, रस्त्यावरील बारीक खडी, तसेच शैवाळाचा अंदाज येत नसल्याने अनेक दुचाकीस्वार घाटात दुचाकीवरून आदळून जायबंदी होत आहेत.

**या ठिकाणी जरा जपून**

सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाचा जोर अधिक असून, पाऊस व धुक्यामुळे घाटमार्गातील प्रवास धोक्याचा ठरू लागला आहे. वाहनधारकांनी मेढा-महाबळेश्वर मार्गावर असलेला केळघर घाट, महाबळेश्वर पोलादपूर मार्गावरील आंबेनळी घाट व पाचगणी-वाई मार्गावरील पसरणी घाटातून ये-जा करताना वाहने सावकाश चालवावी, अती पाऊस व दाट धुके असल्यास वाहन चालविण्याचे धाडस करू नये.

**ही काळजी घ्याच...**

घाटामार्गातील रस्ता वळणावळणाचा व तीव्र उताराचा आहे.

पाऊस व शैवाळामुळे रस्ते गुळगुळीत झाले आहेत. त्यामुळे दुचाकीस्वारांनी घाटातून रात्रीचा प्रवास टाळावा.

दुचाकी अथवा चारचाकीतून प्रवास करताना वेगावर नियंत्रण ठेवावे. जर गाडीचा वेग अधिक असेल, तर गुळगुळीत रस्त्यावर वाहने घसरू शकतात.

मुसळधार पावसात प्रवास करणे टाळावे. रात्रीच्या वेळीदेखील प्रवास न केलेलाच बरा, कारण मुसळधार पावसामुळे दरडी कोसळण्याची शक्यता अधिक असते.

**...तर जीवाला धोका**

पावसाचा जोर वाढल्याने घाटात ठिकठिकाणी लहान धबधबे कोसळू लागले आहेत. घाटातून प्रवास करणे अनेक पर्यटक, तसेच नागरिक ये-जा करताना या धबधब्यांजवळ थांबून फोटोसेशन करत असतात. काही जण धबधब्याखाली भिजण्याचा आदंनही लुटत असतात. शिवाय फोटोसेशन व रिल्सही तयार करत असतात. हा स्टंट जीवघेणा ठरू शकतो, याचा पर्यटक व नागरिकांची विचार करणे गरजेचे आहे.

# अनिल देशमुखांचा दाव्यांचा सिलसिला कायम, फडणवीसांच्या उत्तराकडे लक्ष

**मुंबई :** देवेंद्र फडणवीसांचं आव्हान अप्रत्यक्षपणे स्वीकारुन अनिल देशमुखांनी त्यांच्यावरच्या आरोपांबद्दल अजून एक गौप्यस्फोट केलाय. आरोपांनुसार फडणवीसांनी देशमुखांकडे जो व्यक्ती पाठवला होता.

देशमुख म्हणाले की, काही प्रतित्रापत्र घेवून समित कदम नावाचा व्यक्ती फडणवीसांनी माझ्याकडे पाठवला होता. फडणवीसांना तुमच्याशी बोलायचं म्हणून तो म्हणाला. त्यानं फडणवीसांशी माझं बोलणं करुन दिलं. त्या व्यक्तीनं सोबत आणलेल्या प्रतिज्ञापत्रात उद्धव ठाकरे, अजित पवार, अनिल परब आणि आदित्य ठाकरेंवर खोटे आरोप होते. त्यावर गृहमंत्री म्हणून मी स्वाक्षरी केली असती तर ते चारही नेते अडकले असते. त्यामोबदल्यात मला ईडीच्या कारवाईपासून मुक्त करण्याची ऑफर फडणवीसांची होती. मात्र खोट्या प्रतिज्ञापत्रांवर मी स्वाक्षरीस नकार दिला. आणि तुरुंगात जाणं पसंत केलं. समित कदम जे बोलला त्याच्या साऱ्या क्लिप्स आपल्याकडे आहेत,असंही देशमुखांनी म्हटलंय

समित कदम हा व्यक्ती सांगलीतल्या मिरजचा राहणारा असून जनसुराज्य पक्षाच्या युवा प्रदेशाध्यपदाची जबाबदारी त्याच्याकडे जनसुराज्य पक्षाचे आमदार विनय कोरे भाजपसोबत महायुतीत आहेत. ४ दिवसांपूर्वी शाम मानव यांच्या आरोपांनी जेव्हा हा वाद सुरु झाला., तेव्हा देशमुखांनी खोटे आरोप करणं सुरु ठेवल्यास ते शरद पवार, ठाकरेंबद्दल काय-काय बोलले आहेत. याचे व्हिडीओ बाहेर काढण्याचा इशारा फडणवीसांनी दिला होता. देशमुखांनी मात्र आता थेट व्यक्तीचं नाव घेत त्यांची भूमिका कायम ठेवलीय.त्यामुळे फडणवीस आता कोणते व्हिडीओ बाहेर काढणार याकडे साऱ्यांच्या नजरा आहेत.

दुसरीकडे भाजप आमदार परिणय फुकेंनी अनिल देशमुखांचा वैद्यकीय जामीन रद्द करुन त्यांना पुन्हा तुरुंगात टाकण्याची मागणी केलीय., मात्र देशमुखांना वैद्यकीय कारणांसाठी नव्हे तर आरोपांत तथ्य नव्हतं म्हणून जामीन मिळाला आहे. आरोपांआधी जामीन ऑर्डर बघून घ्यावी, असा सल्ला अनिल देशमुखांचे पुत्र सलील देशमुखांनी भाजपला दिलाय.

देशमुखांवर भाजपनं १०० कोटी वसुलीचा आरोप केला होता. परमबीर सिंहांच्या आरोपांवरुन याची सुरुवात झाली, ईडीनं देशमुखांना अटक केली. यात पोलीस अधिकारी सचिन वाझेही आरोपी होते. पुढे वाझेच या केसमध्ये माफीचे साक्षीदार बनले. मात्र कोर्टानं स्वतः साक्षीदारच गुन्हेगारी पार्श्वभूमीचा असल्यानं त्याच्या आरोपांना किती विश्वासार्ह मानायचं म्हणून कोर्टानं निरीक्षण नोंदवलं होतं. त्यात चौकशीवेळी परमबीर सिंहांनी चांदिवाल आयोगापुढे आपण हे आरोप ऐकीव माहितीवर केले असून कोणतेही पुरावे नसल्याची साक्ष दिली.

## अजितदादांची साथ सोडणाऱ्यांना माफ करणार नाही; राष्ट्रवादीचा इशारा

**मुंबई :** विधानसभा निवडणूक जवळ येईल तशी अनेक राजकीय नेत्यांची चलबिचल सुरू झाल्याचे दिसून येत आहे. आपले राजकीय भविष्य सुरक्षित करण्यासाठी महायुती - महाविकास आघाडीत इनकमिंग - आऊटगोईंग सुरू झाले आहे. याचा फटका राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला जास्त बसत असल्याचे दिसते.

सध्या राष्ट्रवादीत अतुल बेनके, चेतन तुपे आणि नरहरी झिरवाळ हे शरद पवार गटात जाणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्यावर अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी सूचक इशारा दिला आहे.

अजित पवार -क्षळीं झुरी गटातील नेते माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांनी शरद पवार गटात प्रवेश केला आहे. आमदार नरहरी झिरवळ हे आपली भूमिका जाहीर करणार आहेत. तर आमदार चेतन तुपे पवारांच्या व्यासपीठावर दिसले. यावर अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी सोडून जाणाऱ्यांना जनता माफ करणार नाही, असा सूचक इशारा दिला आहे.

मिटकरी म्हणाले, अजित पवारांची साथ सोडून बाहेर पक्षात जात असलेल्या गद्दारांना जनता माफ करणार नाही. अजितदादांनी अमोल कोल्हे, निलेश लंके, बाबाजानी दुर्राणी यांच्यासारख्या लोकांना खूप काही दिले आहे. त्यानंतरही त्यांनी विश्वासघात केला आहे, असा आरोपही मिटकरींनी केला.

मिटकरींनी चेतन तुपे हे शरद पवारांच्या ढ्हरीरव झुरी व्यासपीठावर गेल्याच्या मुद्द्यावर हे स्पष्टीकरण दिले आहे. एखाद्या नेत्याच्या व्यासपीठावर जाणे म्हणजे त्या पक्षात प्रवेश करणे नव्हे, असे ते म्हणाले. दरम्यान, लवकरच राष्ट्रवादीत मोठ्या प्रमाणात इन्कमिंग होणार असल्याचाही गौप्यस्फोट आमदार मिटकरी यांनी यावेळी केला आहे.

# पुण्यातील पुराचा पहिला दणका वरिष्ठ अधिकाऱ्यांना; थेट निलंबनाची कारवाई

**पुणे :** खडकवासला धरणातून मुठा नदीपात्रात सोडलेल्या पाण्यामुळे सिंहगड रस्ता परिसरातील अनेक घरांमध्ये पाणी घुसले. त्यामुळे हाहाकार उडाला. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, पालकमंत्री अजित पवारांनी तिथे जाऊन पाहणी केली. काही ठिकाणी त्यांना नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. त्यानंतर या स्थितीचे खापर वरिष्ठ अधिकाऱ्यांवर फोडण्यात आले आहे.- पुणेमहापालिकेच्या सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयातील सहाय्यक आयुक्त संदीप खलाटे यांना सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. त्यांची खातेनिहाय चौकशी केली जाणार आहे. महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी हे आदेश काढले आहेत.



आयुक्तांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे की, २५ जुलैला सिंहगड रोड येथे अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीची पाहणी करण्यासाठी भेट दिली असता खलाटे यांनी केलेल्या कामामध्ये कर्तव्यपरायणता दिसून आलेली नाही. तसेच त्यांनी कामाची जबाबदारी योग्यरीतीने पार पाडली नसून ही अशोभनीय गोष्ट केलेली आहे.कर्तव्य पार पाडताना खलाटे यांनी गुणवत्ता, औचित्य व उत्तरदायित्व ठेवले नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्यांना मनपा सेवेतून निलंबित करण्यात येत आहे. खलाटे यांच्याविरुध्द खातेनिहाय चौकशीची कार्यवाही करण्याची दक्षता उपायुक्तांनी घ्यावी, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, खडकवासला धरणातून अचानक रात्री पाणी सोडण्यात आल्याचा ठपका पालिका प्रशासनाने जलसंपदा विभागावर ठेवला आहे. तर पाणी सोडण्याबाबतची माहिती आधीच दिल्याचा दावा या विभागाने केला आहे. त्यामुळे या दोन यंत्रणांमध्येच वाद सुरू असून त्याचा पहिला बळी खलाटे ठरले आहेत, अशी चर्चा आता पालिका वर्तुळात सुरू आहे.

सिंहगड रस्ता परिसरातील स्थिती अत्यंत भयानक होती. नागरिकांची प्रचंड झाले झाले. त्यानंतर पूर परिस्थिती निर्माण झाली तेव्हा पालकमंत्रीअजित पवारयांनी पूरग्रस्त भागाला भेट दिली होती. जबाबदार अधिकाऱ्यांवर त्वरित कारवाई करण्याचे आदेश पवारांसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. त्यानंतर आयुक्तांनी ही कारवाई केली.

## शरद पवारांकडे महाराष्ट्राच्या विकासाचं कुठलंही व्हिजन नाही; गोपीचंद पडळकरांची टीका

**मुंबई :** शरद पवारांना काहीही करायचं नसतं. नुसती मिजासगिरी करायची, मोठेपणा करायचा आणि मी खूप काही करतो, असं भासवायचं असतं, अशा शब्दांत भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर टीका केली.

आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले, शरद पवारांना फक्त राजकारण करायचंय आहे. जवळच्या पै-पाहुण्यांना मोठं करायचं आहे. त्याच्या पलीकडे ते जाऊ शकत नाहीत. त्याच्या पलीकडे त्यांचं कुठलंच व्हिजन नाही. महाराष्ट्राला प्रगतिपथावर नेण्यासाठी त्यांनी आतापर्यंत कुठलंही व्हीजन दाखवलेलं नाही. शरद पवारांना कुठलंही व्हिजन नाही, त्यांनी महाराष्ट्राच्या विकासात कुठलेही व्हिजन दाखवलेलं नाही. अनेक वर्षे त्यांनी महाराष्ट्राचे सत्ताकारण केलं. मात्र, उसाला दर, दुधाला दरवाढ त्यांनी कधीही दिलेली नाही. युवकांसाठी त्यांनी कुठलेही काम केलेलं नाही, असा आरोप पडळकर यांनी पवार यांच्यावर केले. चेहेश्र झेश्रळींळली : राष्ट्रवादीच्या राजन पाटलांच्या विरोधात सर्व विरोधक एकवटले; मोहोळचा आमदार बदलण्याचा इशारा...इंडिया आघाडीने लोकसभा निवडणुकीत जिंकलेल्या जागासंदर्भातही पडळकर यांनी भाष्य केले. ते म्हणाले, नऊ जागा निवडून आल्या तरी त्यांची इतकी छाती फुगलेली आहे, ज्यांच्या जागा कमी निवडून आल्या आहेत, त्यांनाच असं वाटतंय की, आपण भारत जिंकला आहे. पण, विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात महायुतीचंच सरकार येणार आहे.लोकसभा निवडणुकीवेळी संविधानाचा विषय घेऊन तुम्ही लोकांना फसवलं. पण, विधानसभेत हा मुद्दा चालणार नाही. महाविकास आघाडीकडे राज्यात कुठलेही सक्षम उमेदवार नाहीत.

# सुनील तटकरेंकडून संजय राऊत यांची बोलती बंद; 'त्या' प्रश्नावर दिला करारा जवाब

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी वेषांतर करूनच सरकार पाडलं, अशी टीका ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली होती. संजय राऊत यांच्या या टीकेचा राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी समाचार घेतला आहे. तटकरे यांनी या प्रश्नावर एक उलटा प्रश्न करत संजय राऊत यांची बोलतीच बंद केली आहे. २०१९मध्ये तुम्ही भाजपला धोका देऊन राष्ट्रवादी आणि काँग्रेस नेत्यांच्या भेटी घेत होतात, त्याला काय नाव देणार? असा सवालच सुनील तटकरे यांनी केला आहे. तटकरे यांनी मीडियाशी संवाद साधताना संजय राऊत यांच्यावर पलटवार केला आहे.

२०१९ ची निवडणूक भाजप आणि शिवसेना एकत्र लढले होते. या निवडणुकीत युतीला कौल दिला होता. असं असताना संजय राऊत हे शरद पवार आणि काँग्रेसचे दरवाजे झिजवत होते. त्यानंतर महाविकास आघाडी स्थापन केली. कौल युतीला असून तुम्ही छुप्प्या भेटी घेऊन आघाडी स्थापन केली. त्याला काय नाव देणार? असा सवाल सुनील तटकरे यांनी केला. जनतेचा कौल त्यांच्या बाजूने होता. जनतेच्या कौलाला कोणी छेद



दिला? हे कपट कोणाचे होते? याचे उत्तर संजय राऊत यांनी द्यावं, असं आव्हानच सुनील तटकरे यांनी राऊत यांना दिलं.

**दादा स्वभावाप्रमाणे बोलले**

अजितदादा काल दिवसभर दिल्लीत होते. दिल्लीतील काही पत्रकार त्यांच्याकडे गेले. त्यांच्या विनंतीवरून दादांनी त्यांच्याशी एक तास गप्पा मारल्या. खेळीमेळीच्या वातावरणात गप्पा झाल्या. दादांच्या स्वभावाप्रमाणे जे काही बोलायचं होतं ते बोलले. आज सगळा तपशील आपल्या वाहिन्यांवर फिरत आहे. काल अजितदादा पत्रकार मित्रांजवळ बोलले. त्या पत्रकारांकडूनच तुम्ही अधिक माहिती घ्या, असं सुनील तटकरे म्हणाले.

**ऑगस्टपासून जनसन्मान यात्रा**

सरकारच्या माध्यमातून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दहावा अर्थसंकल्प मांडला. राज्याच्या अर्थकारणाला, समाजकारणाला, ग्रामीण भागाला आणि सर्वांना ताकद देणारा अर्थसंकल्प राज्याच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच मांडला गेला. अजित दादांची जनसन्मान यात्रा आम्ही ऑगस्टपासून सुरू करत आहोत. त्याची सुरुवात नाशिकमधून करत आहोत. सर्व घटकांशी अजितदादांचा थेटपणे संवाद होणार आहे. माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री बळीराजा योजना, थकीत बिल माफ होऊन बारा तास वीज शेतकऱ्यांना मोफत मिळणार अशा अनेक योजना राबवल्या जाणार आहे.

नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी ५ हजार रुपये अनुदान देणार आहोत. या सर्व गोष्टी या यात्रेतून सांगितल्या जाणार आहेत. दोन महिन्यांनी निवडणुकीला सामोरे जायचं आहे. त्यामुळे हे निर्णय लोकांपर्यंत कसे पोचतील, राजकीय विचारधारा, जनतेच्या दृष्टिकोनातून घेतलेले क्रांतिकारी निर्णय या माध्यमातून सर्वसामान्यपर्यंत कसे पोहोचवता येतील हा या यात्रेमागचा हेतू आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

**तीन दिवसांपूर्वीच चर्चा**

तीन दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची बैठक झाली. आम्ही एक समन्वय समिती नेमत आहोत. राज्यात एकत्रितपणाने नियोजन करण्याच्या दृष्टिकोनातून जागा वाटपाच्या संदर्भात सुद्धा दोन दिवसात चर्चा होईल. चर्चा पूर्ण झाल्यानंतर त्या संदर्भात तपशील देऊ. जागावाटप्याच्या संदर्भात कुठलाही मतभेद नाही. निवडून येण्याची क्षमता, सीटिंग उमेदवार या सर्व गोष्टींची निर्णय आम्ही घेणार आहोत, असंही त्यांनी सांगितलं.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# तेलंगणाप्रमाणे महाराष्ट्रात कर्ज माफी करा : प्रा. विश्वंभर बाबर

**दहिवडी** : विविध कारणामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला मदतीचा हात देण्यासाठी तेलंगण राज्या प्रमाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी राष्ट्रीय काँग्रेस तर्फे करण्यात आले आहे.

याबाबतचे निवेदन प्रदेश किसान काँग्रेसचे उपाध्यक्ष कृषिरत्न प्रा. विश्वंभर बाबर, म्हसवड शहर काँग्रेसचे अध्यक्ष विकास गोंजारी,जिल्हा सरचिटणीस विष्णुपंत अवघडे, युवक काँग्रेसचे दाऊद मुल्ला इत्यादी पदाधिकाऱ्याच्या सहीचे निवेदन माण खटावच्या प्रांताधिकारी उज्वला गाडेकर यांना देण्यात आले.

सातारा जिल्ह्यातील अनेक तालुक्यात उन्हाळी हंगामात तीव्र पाणीटंचाई मुळे उन्हाळी हंगाम वाया गेला. माण तालुक्यात तर पिण्याच्या पाण्यासाठी टँकर लावावे लागले. पाणीटंचाईमुळे फळबागाची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले,आणि सध्या जुलै मध्ये सातारा जिल्ह्यातील पश्चिमेकडील पाटण महाबळेश्वर जावली तालुक्यात अतिवृष्टीमुळे भाजीपाला व इतर पिके वाया गेल्याने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झालेले आहे.

अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याला मदतीचा हात देण्यासाठी तेलंगणा राज्याप्रमाणे शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी. प्रलंबित पिक विम्याची रक्कम तातडीने देण्यात यावी. बँकेच्या सिबिलच्या कक्षेतून शेतकऱ्यांना वगळण्यात यावे. सरसकट देण्याची मागणी किसन काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. विश्वंभर बाबर व काँग्रेस पदाधिकारी यांनी केलेली आहे.

# अवजड वाहतूकीचा वडूथ - वाढे पुलाला धोका



## वाढे पुलावर खड्डे पडले असून त्यात अपघाताचा धोका संभवतो

**सातारा** : कृष्णा, वेण्णा नदीवर १७५ वर्षांपूर्वीचे ऐतिहासिक दगडी पुल आहेत. सध्या धुवाँधार पावसाने कहर केला असून यामुळे या दोन्ही पुलाला संभाव्य धोके लक्षात घेऊन मोठी वर्दळ असणारी अवजड वाहतूक बंद करण्याची मागणी थेट जिल्हाधिकाऱ्यांना ग्रामस्थांनी केली आहे. या सोबत पुलावर मोठे खड्डे पडले आहेत ज्यामध्ये वाहतूक करताना अपघाताचा धोका वाढला आहे. त्यात पाणी साचून नागरिक पडत आहेत.

तब्बल १७५ वर्षांहून अधिक काळाचा आजही मजबूत आणि वास्तुशास्त्राचा अचंबित करणारा नमुना असलेले वडूथ वाढे येथील नदीवरील पूल आहेत. त्यावर खड्डे पडलेले, झाडे झुडपे उगवलेली असून ही तो आज सुस्थितीत आहे. त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करून मजबुतीसाठी लोकप्रतिनिधी प्रयत्न करण्याची गरज आहे. मोठ्या प्रमाणावर होणारी अवघड वाहतूक या पुलास धोकादायक ठरू शकते, त्यामुळे वाहतूक अन्य पर्यायी मार्गांनी वळवावी, अशी मागणी भाजपचे युवा मोर्चाचे जिल्हा सचिव मदन साबळे यांनी बोलताना सांगितले. सातारा शहराकडे येणाऱ्या राजमार्ग क्रमांक ९५६ डी वर असलेल्या वडूथ येथील कृष्णा नदीवरील तब्बल १७५ वर्षांपुर्वीचा छत्रपती शहाजीराजे भोसले यांच्या कल्पनेतून साकारलेल्या वास्तुशास्त्राचा अद्भुत नमुना असणारा दगडी बांधकामातील पुल आणि तसाच वाढे गावालगत वेण्णा नदीवरील पूल आहे.या दोन्ही पुलावर पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने मोठे मोठे खड्डे पडले आहेत. पुलाच्या बांधकामात अनेक झाडे झुडपे उगवली असून त्याचा पुलाला धोका संभवतो. तर पुलावरील खड्ड्यांमुळे सतत अपघात होत असून अनेक वाहनधारकांना दुखापती झाल्या आहेत.

पुलावरील खड्ड्यांचा पुलाच्या अस्तित्वाला धोका ओळखून यावरून मोठी वर्दळ असणारी अवजड वाहतूक या पुलाला धोकादायक ठरू शकते. याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले असल्याने आता थेट जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन या दोन्ही पुलावरील पाऊस कमी होईपर्यंत अवजड वाहतूक बंद करावी अशी मागणी वडूथ, वाढेसह परिसरातील ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

# सफाई कर्मचाऱ्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून द्या : एम. व्यंकटेशन



**सातारा** : राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष एम. व्यंकटेशन यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. बैठकीत उपस्थित झालेल्या समस्या प्रशासनाने सोडवाव्यात. त्याचबरोबर त्यांना सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन अधिनियम २०१३ च्या अंमलबजावणीबाबत बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात संपन्न झाली. या बैठकीला आमदार दीपक चव्हाण, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त नितीन उबाळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.महेश खलीपे, नगर प्रशासन अधिकारी अभिजीत बापट यांच्यासह विविध नगरपरिषदांचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

श्री. व्यंकटेशन म्हणाले, सफाई कामगारी यांची प्रत्येक महिन्याला आरोग्य तपासणी करावी. बैठकीत उपस्थित केलेल्या तक्रारींबाबत प्रशासनाने सकारात्मक निर्णय घ्यावे. सफाई कर्मचाऱ्यांच्या काही तक्रारी असल्यास आयोगाच्या दूरध्वनी क्रमांकावर तसेच संकेतस्थळावर कराव्यात. सफाई कर्मचाऱ्यांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना आहेत या योजनांचाही लाभ देण्यात यावा,असेही निर्देश आयोगाचे अध्यक्ष श्री. व्यंकटेशन यांनी दिले.

सफाई कामगारांच्या शिक्षणाानुसार त्यांना बढती देण्यात यावी. सफाई कामगार नगरपरिषदांच्या घरांमध्ये राहत आहे ती घरी त्यांच्या नावावर करावीत. तसेच कॉन्ट्रॅक्ट बेसवर काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना कायम करावे अशा मागण्या आमदार दीपक चव्हाण बैठकीत मांडल्या.

सफाई कर्मचारी ३५ वर्षाहून अधिक काळ शासकीय निवासानात राहत आहेत ते निवासस्थान त्यांच्या नावावर करण्याची कार्यवाही नगरपरिषद यांनी करावी. त्याचबरोबर सफाई कर्मचाऱ्यांची प्रत्येक महिन्याला आरोग्य तपासणी करावी. या कर्मचाऱ्यांना अन्य कोणत्याही प्रकारचे काम लावू नये. ज्या कर्मचाऱ्यांना घरे नाहीत अशा सफाई कर्मचाऱ्यांना रमाई आवास योजनेतून घरकुल उपलब्ध करून देण्यात येईल, असे जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी बैठकीत सांगितले.

कर्मचाऱ्यांना कोणी सोयी सुविधा उपलब्ध करून देत नसेल तर त्याच्यावर कार्यवाही करण्यात येईल. त्याचबरोबर सफाई कर्मचाऱ्यांचे पगार बँक खात्यात जमा करावे,असे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी सांगितले. सफाई कर्मचाऱ्यांचे प्रश्न व त्यांना वेळोवेळी सुविधा उपलब्ध करून देत असल्याबद्दल नगर प्रशासन अधिकारी श्री. बापट यांचा आयोगाच्या अध्यक्षांनी सत्कार केला.

## रस्ता अपघातात पती - पत्नी जागीच ठार

**दौंड** : पुणे - सोलापुर महामार्गावर रस्ता ओलांडनाऱ्या मोटार सायकलला लक्झरीने पाठीमागुन जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटार सायकलवरिल पती - पत्नी गंभीर जखमी होवून जागीच ठार झाल्याची माहिती दौंडचे पोलिस निरीक्षक संतोष डोके यांनी दिली आहे.

हा अपघात रविवार २८ जुलै रोजी सकाळी १० च्या दरम्यान सोलापुर महामार्गावर मळद येथे घडला आहे. या अपघातात मोटार सायकल वरील दताजी गंगाधर यादव आणी त्यांची पत्नी सुमन दत्ताजी यादव हे पती पत्नी जागीच ठार झाले आहेत.

# पूर ओसरलेल्या भागातून मनपाकडून कचरा उठाव सुरु



**कोल्हापूर** : मुसळधार कोसळणाऱ्या पावसाने काही अंशी उसंत घेतल्याने पाणी पातळी इंचा इंचाने घटत आहे यामुळे सकल भागात साचलेले पाणी काही अंशी कमी होताना दिसत आहे. जयंती नाला परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते दरम्यान ज्या भागातले पाणी कमी होत आहे त्या ठिकाणी महापालिका आरोग्य विभागाच्या वतीने स्वच्छता केली जात असून कचरा उठाव औषध फवारणी, धूर फवारणी देखील केली जात आहे.

सहाय्यक आयुक्त कृष्णा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी व्हीनस कॉर्नर तसंच शाहुपुरी परिसरात धुर फवारणी केलीय. सिद्धार्थ नगर परिसरात साफसफाई करून औषध फवारणी करण्यात आली आहे

# पाटण - हेळवाक रस्ता खिळखिळा



**पाटण** :- दोन जिल्ह्याचे पालकमंत्री असलेले ना. देसाई खुद्द पाटण तालुक्याचे सुपुत्र आहेत. पाटण तालुक्यात कोट्यावधी चा निधी आणताना मुख्य रहदारीचा मार्ग असलेला कराड- चिपळूण मार्ग रखडला आहे.

गेली सात वर्षे पाटण ते हेळवाक, घाटमाथा हा रस्ता जाणूनबुजून दुर्लक्षित केला जात आहे. या रस्त्याची खड्डे आणि डबऱ्यांमुळे दैयनीय अवस्था होऊन पुन्हा एकदा रस्ता खिळखिळा झाला असताना यामुळे वाहनांचा मात्र खुळखुळा वाजतो आहे. या रस्त्याची कायमस्वरूपी दुरुस्ती होण्यासाठी आम्ही गेली सात वर्षे संघर्ष करत आहोत. बांधकाम विभागाच्या नाकर्तेपणामुळे या रस्त्यावर अनेक अपघात झाले आहेत. अनेकांचे प्राण गेले आहेत. अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. आता हे आंदोलन केवळ तात्पुरत्या रस्ता दुरुस्तीसाठी नाही तर कायमस्वरूपीसंगमनगर (धक्का) कोयना माई सांस्कृतिक भवन, वांझोळे येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी पं. स सभापती राजाभाऊ शेलार, बाळासाहेब कदम, मनिष चौधरी, रमेश जाधव, संजय सावंत, डीपी कदम, विजय कांबळे, पंकज गुरव, , राजेश पवार, सत्यजीत शेलार व कोयना विभागातील नागरिक उपस्थित होते.

बबनराव कांबळे बोलताना म्हणाले पाटण कोयना रस्त्याच्या बाबत आम्ही गेली सात वर्ष संघर्ष करत आहोत. प्रत्येक वर्षी पाऊसाळा सुरू झाला की कोयना विभागात रस्ता, खड्डे, डबरे हे समीकरण झाले आहे. दयनीय अवस्था झालेल्या या रस्त्यावरून प्रवास करताना नागरिक व पर्यटक बांधकाम विभागा बरोबर लोकप्रतिनिधींना शिव्याशाप देत आहेत. पाटण ते हेळवाक, घाटमाथा हा रस्ता नादुरुस्त ठेवून कोयनेच्या पर्यटनाला जाणूनबुजून खो घालण्याचा प्रयत्न केला गेला आहे. कोयनेचे पर्यटन बंद पाडले आहे. लोक इतरत्र स्थलांतरित झाले आहेत. गाव सोडून मुंबई पुण्याचे चाकरमानी झालेले आहेत. उद्योग धंदे बंद पडलेले आहे. व्यापारी वर्ग संपला आहे. अपघातात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अनेक अपघात प्रवाशांच्या जीवावर बेतले आहेत.

आजारी रुग्णांवर रस्त्या अभावी वेळेवर उपचार होत नसल्याने त्यांनाही प्राणास मुकावे लागत आहे. या सर्वांना पाटण ते हेळवाक, घाटमाथा हा रस्ता कारणीभूत आहे. यामुळे मागील सात वर्ष रस्त्याचे काम रखडत ठेवलेल्या संबंधित अधिकारी, ठेकेदार कंपनी वरती मनुष्य वधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. यांची नुकसान भरपाई शासनाने दिली पाहिजे. या मागणीसाठी मंगळवारी ६ ऑगस्ट रोजी संगमनगर धक्का येथे रस्ता रोको आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला.

खराब रस्त्यामुळे पालकमंत्र्यांची नामुष्की- राजाभाऊ शेलार

कोयना विभागात चालू वर्षी देखील मोठ्या प्रमाणात अतिवृष्टीचा पाऊस सुरु आहे. या पावसामुळे लोकांची दयनीय अवस्था होत असताना जनजीवन विस्कळित झाले आहे.

पाटण ते कोयना या रस्त्याच्या खराबीमुळे सर्वसामान्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अशावेळेला पालकमंत्र्यांनी कोयना विभागात येवून लोकांच्या अतिवृष्टीतील अडचणी जाणून घ्यायला हवे होते. तसा त्यांचा शुक्रवारी नियोजित कोयना दौरा आयोजित झाला होता. मात्र पालकमंत्र्यांनी रस्त्याच्या खराबीमुळे कोयनेला येणं अर्ध्यावरच सोडून दिले. हि नामुष्की पालकमंत्र्यांना त्यांच्याच तालुक्यात सहन करावी लागली या पेक्षा दुसरे दुर्दैव नाही.

# कोरेगाव तालुक्यात धुवाँधार पाऊस रस्त्यांना आले तळ्याचे स्वरूप

## सलग सहाव्या दिवशीही तालुक्यात पावसाचा जोर कायम

**कोरेगाव** : कोरगाव शहरासह तालुक्यातील नऊ महसूल मंडलातील गावांना सहाव्या दिवशी ही मुसळधार पावसाने झोडपले, तालुक्यात ठिकठिकाणी रस्त्यावर पावसाचे पाणी साठल्याने अक्षरशः रस्त्यांना तळ्याचे स्वरूप आले आहे. यातून वाट काढताना वाहन चालकांना जीव मुठीत घेऊन कसरत करावी लागत आहे. तसेच कोरेगाव तहसीलदार कार्यालय व कोरेगाव पोलीस ठाणे आवारातील बहुसंख्य कार्यालय आवारात पाणी साठल्याने शासकीय कामासाठी आलेल्या नागरिकांची त्रेधातिरपीट उडाली, तात्काळ सार्वजनिक बांधकाम विभागाने जेसीपी लावून तुंबलेल्या पाण्याला वाट करून दिली.

कोरेगाव तालुक्यातील बहुसंख्य गावाला जोडणाऱ्या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले असून सार्वजनिक बांधकाम विभागाने मुरूम टाकून केलेली तात्पुरती मलमपट्टी पावसामुळे वाहून गेली असून पुन्हा रस्त्यांची चाळण झाल्याने वाहनधारकांना कसरत करीतच वाहन चालवावे लागत आहे. गेले सहा दिवस संतत धार पडणाऱ्या पावसामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची शेती कामं ठप्प झाली आहेत तर शेतशिवार मात्र हिरवागार झाला आहे.

कोरेगाव तालुक्यात बहुसंख्य गावात नागरिकांनी ओढे, नाले, ओघळी मुजवून अतिक्रमण करून केल्याने ठिकठिकाणी पाणी साचल्याने घरात पाणी दारात चिखल अशी परिस्थिती उद्भवली आहे. तर कोरेगावात महादेव नगर, दत्तनगर यासह बहुसंख्य ठिकाणी पडलेल्या पावसाच्या पाण्यामुळे नैसर्गिक ओढ्यांना नदीचे स्वरूप आल्याचे दिसून आले.

संततदार पडणाऱ्या पावसामुळे कोरेगाव तालुक्यात बहुसंख्य गावात मृदसंधारणाची बहुसंख्य कामे झाल्याने काढलेल्या शोषखड्डे व चारीमध्ये पाणी तुडुंब भरले असून साठलेले पाणी जमिनीत झिरपत आहे. पाणी फाउंडेशनच्या या कामामुळे ओढ्या ओघळींना अध्यापी पूर आला नाही.

कोरेगाव तहसीलदार कार्यालय आवारातील नगर भूमापन अधिकारी पोलीस ठाणे उपकोषाधिकारी अधिकारी, एकात्मिक नागरी सुविधा नागरी केंद्र अशी विविध कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असून कामकाज करताना अडचण निर्माण होत आहेत. तहसील कार्यालयाच्या पाठीमागील बाजूस असलेल्या पोलिस वसाहतीतील विहीर मुजवल्याने पावसाळ्यात दरवर्षी तहसील कार्यालय जलमय होत होत असल्याचे दिसून येते.

# पर्यटनवाढीच्या दृष्टीने वन खात्याच्या अखत्यारीत विकासकामे मार्गी लावा : आ. शिवेंद्रसिंहराजे

## उप वनसंरक्षक अदिती भारद्वाज यांना केल्या सूचना



**सातारा** : कास पठार, ठोसेघर आणि भांबावली धबधबा येथे वन विभागाची जागा आहे. पर्यटकांची सुरक्षा, सोयी सुविधा आणि पर्यटनस्थळांचा विकास या दृष्टीने वन खात्याच्या अखत्यारीत असणारी कामे वन विभागाने तातडीने मार्गी लावावीत. तसेच राज्य शासन पातळीवरून होणाऱ्या कामांसाठीचे प्रस्ताव तातडीने तयार करून ते शासनाकडे पाठवा, अशा सूचना आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या.

कास पठार, ठोसेघर धबधबा आणि भांबावली धबधबा या ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या आणि सोयीच्या दृष्टीने प्रस्तावित कामे मार्गी लागावीत आणि पर्यटनस्थळांचा विकास व्हावा यादृष्टीने आ. शिवेंद्रसिंहराजे यांनी वन विभागाच्या कार्यालयात जाऊन उप वनसंरक्षक अदिती भारद्वाज यांची भेट घेतली. यावेळी झालेल्या बैठकीत आ. शिवेंद्रसिंहराजे बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजू भोसले, शंकरराव चव्हाण, विठ्ठल कदम, जयराम चव्हाण, रविंद्र मोरे, सोमनाथ जाधव, दत्तात्रय किर्दत, रामचंद्र उंबरकर, प्रदीप कदम, दत्taराम बादापुरे, ज्ञानेश्वर आखाडे यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ आणि वन विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत वन विभागाच्या हद्दीतील घाटाई देवी रस्ता, ठोसेघर- मालदेव, बोंडारवाडी रस्ता आदी रस्त्यांची कामे मार्गी लावणे. ठोसेघर येथील धबधब्याच्या परिसरातील पायऱ्या व गॅलरीची दुरुस्ती करणे. ठोसेघर येथे झुलता पूल तयार करण्याचा सर्व्हे झाला असून या कामाला मंजुरी मिळवणे. कास पठार विकास आराखडा तयार करण्यात आला असून याचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे पाठवणे. कास पठार परिसरात सेल्फी पॉईंट, माहिती व दिशादर्शक फलक लावणे, गॅलरी करणे, माहिती केंद्र उभारणे, कुमुदिनी तलावाकडे जाणारा रस्ता करणे, भांबावली धबधबा येथे बांबूची गॅलरी तयार करणे तसेच ती पर्यटकांच्यादृष्टीने सुरक्षित असावी याची काळजी घेणे. कास पठार आणि ठोसेघर येथे पार्किंग व्यवस्था करणे आदी विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

कास पठार व ठोसेघर धबधबा समितीने सुचवलेली कामे मार्गी लागण्यासाठी तातडीने उपाययोजना करा. तसेच विकास आराखडा तयार करून त्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करा, अशा सूचना आ. शिवेंद्रसिंहराजेंनी अधिकाऱ्यांना केल्या. दरम्यान, गॅलरी व झुलता पूल करण्यासाठी बांधकाम विभागाने सर्व्हे करावा, त्यासाठी आम्ही आर्किटेक्ट उपलब्ध करून देतो. याबाबत तातडीने कार्यवाही करा, अशा सूचना आ. शिवेंद्रसिंहराजेंनी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना केल्या.

# महाबळेश्वर तापोळा रस्त्यावर असलेल्या बुरढाणी येथील हॉटेल शेलारच्या इमारतीस शॉर्ट सर्किट आग

**महाबळेश्वर** : महाबळेश्वर तापोळा रस्त्यावर असलेल्या बुरढाणी येथील हॉटेल शेलारच्या इमारतीस सकाळी शॉर्ट सर्किट झाल्याने मोठी आग लागली या आगीत हॉटेल मधील इलेक्ट्रॉनिक वस्तु व फर्निचर आगीत जळुन खाक झाले आगीची खबर मिळताच महाबळेश्वर नगर पालिकेचा अग्नीशाकम बंब घटना स्थळी पोहचला व स्थानिक नागरीकांच्या मदतीने पालिका कर्मचारी यांनी आगीवर नियंत्रण मिळविले

मुसळधार पाउस कोसळत असताना कोट्रोशी येथील गणपत शेलार यांचे बुरढाणी येथील हॉटेलच्या इमारतीस सकाळी सहाच्या दरम्यान आग लागली आग लागल्याचे हॉटेल मधील आचारी याच्या लक्षात आले त्यांनी जवळच्या लोकांना या बाबत माहीती दिली हॉटेल कामगार व स्थानिकांनी वीजेचा स्वीच बंद केला हॉटेलच्या किचन मध्ये असलेले गॅस सिलेंडर बाहेर काढले व हॉटेल मधील स्विमिंगपुल मधील पाण्याने आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले.

दरम्यान हॉटेल मध्ये आग लागल्याची खबर राजेंद्र घाडगे यांनी सोशल मिडीयावर टाकली व मदतीसाठी बंबाची मागणी केली ही पोस्ट पत्रकार विलास काळे यांनी पाहीली व त्यांनी तातडीने पालिकेतील अग्नीशामक विभागाला याची खबर दिली खबर मिळताच अग्नीशामक बंब घटना स्थळी रवाना झाला तर महाबळेश्वर ट्रेकर्सचे जवान अमित कोळी यांनी देखिल पोलिसांना या आगीची खबर दिली.



महाबळेश्वर पासुन सुमारे १५ कि मी अंतरावर असलेल्या बुरढाणी येथे केवळ २० मिनीटात अग्नीशामक घेवुन पालिका कर्मचारी पोहचले स्थानिक नागरीक स्पनिल बोधे राजाभाउ घागडे पाटील अक्षय शेलार राजेश शेलार भिकु सपकाळ यांच्या मदतीने मुसळधार पावसात पालिका अग्नीशामक विभागाने या आगीवर नियंत्रण मिळविले या आगीत हॉटेल मधील फर्निचर व इलेक्ट्रॉनिक्स वस्तु यांचे मोठे नुकसान झाले.

# महाबळेश्वर येथे पावसाचा जोर कमी : पावसाची संततधार सुरू


**महाबळेश्वर :** महाबळेश्वर येथे पावसाचा जोर कमी झाला असला तरी येथे पावसाची संततधार सुरू आहे आज सकाळी संपलेल्या २४ तासात महाबळेश्वर येथे १७४ मी मी तर आज अखेर येथे ३६३३ मी मी पावसाची नोंद झाली आहे पावसाने राखलेल्या सातत्याने तालुक्यात दरडी कोसळण्याची मालिका आज सुरू आहे माहबळेश्वर तापोळा रस्त्यावर चिखली येथे तर राजमार्गावर धारदेव जवळ दरड कोसळण्याची घटना घडली आहे दरडी तातडीने हटवुन वाहतुक सुरळीत करण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाला यश आले आहे.

मागील संपुर्ण आठवडा महाबळेश्वर येथे पावसाने जोरदार बॅटिंग केली परंतु आता त्या मुसळधार पावसाचा जोर कमी झाला आहे परंतु आजही पावसाची संततधार येथे सुरूच आहे अधुनमधुन जोरदार सरी व त्या नंतर पावसाच्या हलक्यासरी कोसळत आहेत पावसाचा जोर कमी झाला असला तरी येथे दरडी कोसळण्याची मालिका आजही सुरू राहीली आहे सार्वजनिक बांधकाम विभागाचे आपत्कालिन पथक कायम सज्ज असल्याने रस्त्यावर आलेल्या दरडी मात्र तत्परतेने काढण्याचे काम केले जात आहे.

आज सकाळी ऐतिहासिक राजमार्गावर धारदेव येथे दरड कोसळुन या रस्त्यावरील वाहतुक पुर्णपणे बंद झाली होती ही खबर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभीयंता अजय देशपांडे यांना समजताच त्यांनी तातडीने दरड हटविण्यासाठी जेसीबीसह पथक रवाना केले दरम्यान आज चिखली येथे देखील महाबळेश्वर तापोळा रस्त्यावर दरड कोसळली होती या दोन्ही दरडी हटवुन तातडीने या दोन्ही मार्गावरील वाहतुक सुरळीत करण्यात सार्वजनिक बांधकाम विभागाला यश आले.

# धोम धरण भरल्याशिवाय निरेकडे पाणी सोडू नका

## पाणी बचाव संघर्ष समितीचे सातारा सिंचन व विभागाला मंडळला निवेदन



**कोरेगांव :** धोम धरण प्रकल्प अहवालानुसार पाणलोट क्षेत्रातील पाण्यावर धोम धरणाचा सर्वप्रथम हक्क असून धरणात कमीत कमी ८० टक्के पाणीसाठा झाल्याखेरीज धरणातील पाणी निरा खोऱ्याकडे सोडू नये असे निवेदन धोम धरण पाणी बचाव संघर्ष समितीने सातारा सिंचन मंडळाच्या अधीक्षक अभियंता अरुण नाईक व सातारा सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता योगेश शिंदे यांना दिले.

धोम धरण पाणी बचाव संघर्ष समितीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की , धोम बलकवडी प्रकल्प अहवालानुसार धोम प्रकल्प पाणलोट क्षेत्रातील अतिरिक्त असणाऱ्या व नदीवाटे खाली वाहून जाणाऱ्या पाण्याचा वापर होण्यासाठी हे पाणी खरीप हंगामात निरा खोऱ्यातील भोर, खंडाळा, फलटण तालुक्यातील शेती करता देण्याचे ठरविले आहे. तसेच धोम धरण भरल्यानंतरच कृष्णा नदी पात्रात पाणी सोडावे.

तसेच पाणी गैरवापर लक्षात घेऊन लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या वतीने रहिमतपुर येथील श्री चंद्रागिरी कालवा पाणी वापर सहकारी सेवा संस्थेतर्फे जलसंपत्ती प्राधिकरणाकडे धो्म प्रकल्प व तदनंतरच्या धोम बलकवडी प्रकल्प अहवालातील तरतुदीनुसार पाणी वापर व्हावा व दोन धरण लाभक्षेत्रातील सिंचन व्यवस्था अबाधित राहण्यासाठी अर्ज केला होता.

त्या अर्जात जलसंपत्ती प्राधिकरणाने पूर्ण संमती दर्शविलेली आहे. त्यानुसार धोम प्रकल्पांतर्गत असणाऱ्या लाभ क्षेत्रातील कृषी सिंचनासाठी नियोजित पाणीसाठा प्रथम प्राधान्याने करावयाचा आहे व पाण लोटातून उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त पाण्याचा वापर बलकडी प्रकल्पांतर्गत करावयाचा आहे. या पार्श्वभूमीवर धोम प्रकल्प व धोम बलकवडी प्रकल्प अहवालाचे तंतोतंत पालन करून धोम धरणात साठवण क्षमते एवढा पाणीसाठा झाल्याखेरीज इतरत्र पाणी वळवू नये. धोम धरण लाभक्षेत्रासाठी राखीव असलेल्या पाण्याचा विनयोग इतरत्र अनाधिकाऱ्यांनी केल्यास धोम लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना धरणे आंदोलन व उपोषण करावे लागेल व त्यातून उद्भवणाऱ्या परिस्थितीत संपूर्णपणे आपण जबाबदार राहाल. असे निवेदनात स्पष्ट नमूद केले आहे. पाणी हा विषय शेतकऱ्यांच्या जीवनाशी अत्यंत निगकडीची बाब आहे. निवेदन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत बर्गे,कार्याध्यक्ष रणजीत फाळके, सचिव नंदकुमार माने पाटील, महादेव भोसले, संतोष जाधव, सुधाकर बर्गे, जगदीश पवार आदी मान्यवरांच्या निवेदनावर सह्या आहेत.

### सुरक्षिततेच्या कारणास्तव

# धबधबे व पर्यटनस्थळे पर्यटकांना तात्पुरत्या स्वरुपात बंद

**सातारा :** भारतीय हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार दिनांक २५ ते ३० जुलै २०२४ अखेर सातारा जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीचा रेड व ऑरेंज अलर्टचा इशारा देण्यात आलेला आहे . सातारा जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीमध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होत आहे. हवामान विभागाने सातारा जिल्हयात आणि घाट क्षेत्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील लिंगमळा व भिलार धबधबा तसेच सर्व पर्यटनाचे पॉइंट, पाटण तालुक्यातील ओझर्ड (नवजा) व सडावाघापूर धबधबा, सातारा तालुक्यातील ठोसेघर, केळवली, वजराई-भांबवली धबधबे व कास तलाव तसेच जावली तालुक्यातील ऐकीव या धबधब्यांच्या ठिकाणी विशेषतः मान्सून कालावधीत वर्षाविहारासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. सदर ठिकाणी कोणतीही अनुचित घटना घडू नये व जिवीत व वित्तहानी होऊ नये या करिता सुरक्षिततेच्या कारणास्तव सातारा जिल्हयातील वरील धबधबे व पर्यटनस्थळे पर्यटकांसाठी तात्पुरते स्वरुपात बंद ठेवणे आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सातारा जितेंद्र डुडी, यांनी सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील लिंगमळा व भिलार धबधबा तसेच सर्व पर्यटनाचे पॉईंट, पाटण तालुक्यातील ओझर्डे (नवजा) व सडावाघापूर धबधबा, सातारा तालुक्यातील ठोसेघर, केळवली, वजराई-भांबवली धबधबे व कास तलाव तसेच जावली तालुक्यातील ऐकीव ही धबधब्याची ठिकाणे आणि सातारा जिल्हयातील सर्व पर्यटन स्थळे पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी तात्पुरते बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

# माणचा फाकड्या अजून झोपलाय

## राष्ट्रवादीचे प्रभाकर देशमुख यांची आमदार गोरेंवर टीका

**दहिवडी :** धैर्यशील मोहिते-पाटील यांना खासदार होवून फक्त दोन महिनेच झालेत. दोन महिन्यात त्यांना जनतेचं दुःख समजलंय मात्र पंधरा वर्षे आमदार असलेल्या माणसाला हे समजलं नाही हे दुर्दैव आहे. खरंतर खासदारांना नाही तर झोपी गेलेल्या तुम्हालाच जागे होण्याची, आत्मपरीक्षणाची गरज आहे असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे नेते प्रभाकर देशमुख यांनी आमदार जयकुमार गोरे यांना लगावला.

दहिवडी येथे संपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब सावंत, जिल्हा उपाध्यक्ष किशोर सोनवणे, भालचंद्र कदम, ॲड. संतोष पवार, हर्षदा देशमुख-जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.



प्रभाकर देशमुख म्हणाले, माण-खटावला २००९ पुर्वी जेवढं पाणी मिळालं त्यातील तिसरा हिस्सा पाणी आपण वापरतोय. आपल्या हक्काचं दोन हिस्से पाणी सांगली व सोलापूरला जातंय. ९७ साली जिहे-कटापुर योजना मंजूर झाली. पाण्याचं आरक्षण झालं. पाणी यायला मात्र एवढी वर्षे लागली. खरंतर दुष्काळी कालावधी आंधळी धरणात हे पाणी आले असताना माण नदीत सोडणं आवश्यक होतं. दुर्दैवाने हे पाणी नदीत सोडलं नाही. त्यामुळे ना दुष्काळाची दाहकता कमी झाली ना लोकांचे अश्रू थांबले. त्यांनी पाणी न सोडण्याचं पाप केल्यामुळे लोकांची पिके जळाली.

प्रभाकर देशमुख पुढे म्हणाले, जिहे-कटापुरचे पाणी येरळवाडी धरणात सुध्दा जाते. धरणात पाणी यावे, तिथले बंधारे भरावेत यासाठी मोठा संघर्ष राष्ट्रवादी, काँग्रेस, शिवसेना, स्वाभिमानी शेतकरी संघटना या सर्वच पक्षांनी केला. यानंतर जिहे-कटापुरचे पाणी कोरेगाव मतदारसंघाच्या हद्दीपर्यंत सोडले गेले. पण माण मतदारसंघाच्या हद्दीत सोडले नाही. हा दुजाभाव का करण्यात आला? हे पाणी न सोडायला कोण जबाबदार आहे? हे प्रश्न आजही अनुत्तरीत आहेत. हे पाणी जर सोडले असते तर शेतकर्यांची उभी पिके वाचली असती.

प्रभाकर देशमुख पुढे म्हणाले, २०१९ च्या निवडणूकीवेळी बिजवडी येथे आमदारांनी सहा महिन्यात पाणी इकडे आले नाही तर राजीनामा देईन असं जाहीर केलं होतं. त्यावेळी ज्याचं भूमिपूजन झालं त्याच प्रकल्पाचं पुन्हा एकदा भूमिपूजन झालं. सहा महिन्यात सोडा पाच वर्षांत ते पाणी आलं नाही. आणि आता ते पाणी पुढच्या पाच वर्षांत या भागात फिरेल हे सांगण्यात येतंय हे माण तालुक्याचं दुर्दैव आहे.

पाणी आणतोय म्हणणारा फाकड्या पंधरा वर्षे झोपलेल्या अवस्थेत आहे. जर पाणी आणायचं असतं तर फाकड्याने पंधरा वर्षात जिहे-कटापुरचं पाणी माण नदीत सोडलं असतं. पण ते सोडलेलं नाही. आता ते पाणी हिंगणी पर्यंत कधी येणार आहे? वितरण व्यवस्था कशी होणार आहे? याच्याबद्दल आजही काही सांगण्यात आलेलं नाही. आता गावोगावी सर्व्हेसाठी माणसं हिंडत आहेत. हा सर्व्हे मागील पाच वर्षांपूर्वी का झाला नाही? त्यावेळी त्याला मंजूरी का मिळाली नाही? त्याला पंधरा वर्षे का लागली? खासदारांना दौर्यादरम्यान शेतकर्यांनी ज्या अडचणी सांगितल्या त्या सोडविण्यासाठी त्यांनी बैठक घेतली, सुचना केल्या. खासदारांनी दोन महिन्यात जे काम केलंय त्याबद्दल राजकारणापलीकडे जावून त्यांना धन्यवाद दिलं पाहिजेत. मी पाणी आणतो, फाकड्याच पाणी आणणार असं का बोललं जातंय? मग पंधरा वर्षे का झोपी गेलाय तुम्ही? दिपक देशमुख यांनी आमदार जयकुमार गोरे यांच्यावरती गंभीर आरोप केले आहेत.

एखाद्या लोकप्रतिनिधीवरती असे आरोप होणं आणि ते प्रकरण उच्च न्यायालयात जाणं, दोनशे मयतांवर उपचार केल्याचे दाखवून त्याचे पैसे हडपणे, हे सर्वच अतिशय गंभीर आहे. याबद्दल त्यांनी खुलासा करण्याची करण्याची आवश्यकता आहे. त्याबद्दल खुलासा न करता पाण्याच्या कामाला चालना देत असलेल्या खासदारांवर टिका करण्यामध्ये त्यांनी वेळ घालवू नये. याऐवजी हक्काच्या साडेबारा टीएमसी मधील दोन तृतीयांश पाणी का बाहेर जातंय हे सांगावं.

### माण मतदारसंघ राष्ट्रवादीलाच

**माण विधानसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादीलाच मिळणार आहे. त्यामुळे मी निवडणूक लढवणार आणि जिंकणार सुद्धा आहे. याबाबत आपण सर्वांनी निश्चिंत रहा असा ठाम विश्वास प्रभाकर देशमुख यांनी व्यक्त केला.**

# पूरबाधितांच्या पंचनाम्यात कुठेही गाफील राहू नका : आमदार सतेज पाटील



**कोल्हापूर :** पूरबाधितांच्या पंचनाम्यात कुठेही गाफील राहू नका.. शेतकरी त्याचबरोबर रहिवाशी आणि व्यवसायिकांचे जे पुरामुळे नुकसान झाले आहे ते कागदोपत्री नोंद करुन त्याचे तातडीने पंचनामे करा. अशा सूचना आमदार सतेज पाटील यांनी केल्या. कोवाड येथे झालेल्या बैठकीवेळी ते बोलत होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी खासदार शाहू महाराज छत्रपती होते.

खासदार शाहू महाराज छत्रपती आणि आमदार सतेज पाटील यांनी चंदगड तालुक्यातील कोवाड या पूरबाधित गावाला आज रविवारी भेट दिली. यावेळी त्यांनी कोवाड येथील स्थानिक नागरिक, व्यवसायीक, आणि शेतकऱ्यांशी संवाद साधला.. पुरामुळे झालेल्या नुकसानीची माहितीही त्यांनी घेतली. या पाहणी नंतर कोवाड या ठिकाणी, खासदार शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. या बैठकीत नागरिकांच्या समस्या त्यांचे प्रश्न खासदार शाहू महाराज आणि आमदार सतेज पाटील यांनी, समजावून घेतले.

यावेळी बोलताना खासदार शाहू महाराज यांनी, पूर ग्रस्तांच्या झालेल्या नुकसानीबाबत अधिकाऱ्यांनी ताबडतोब पंचनामे करून मदत देण्यासाठी तातडीने कार्यवाही करा. अशा सूचना त्यांनी केल्या.

गटर, रस्ते त्याबरोबरच पूल अशा पायाभूत सुविधासाठी निधी देऊ. पूर रोखण्यासाठी, ज्या उपाययोजना कराव्या लागतात त्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू. असही त्यांनी सांगितलं. तसचं ज्या ज्या ठिकाणी पुलाची उंची वाढवण्याची मागणी असेल किंवा रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर भराव टाकल्यामुळे पूरस्थिती निर्माण होत असेल तर याबाबत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करून, ही गोष्ट त्यांच्या लक्षात आणून दिली जाईल. असंही त्यांनी सांगितले.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य कल्लाप्पा भोगण, आजरा नगरपरिषदेचे माजी नगरसेवक अभिजीत शिंपी, कोवाडचे सरपंच अनिता भोगण, प्रभाकर खांडेकर, गोकुळ संचालक अंजली रेडेकर, कॉमेड संपत देसाई यांच्या सह, महाविकास आघाडीतील पदाधिकारी उपस्थित होते.

# सैनिकांच्या कल्याणासाठी शासन कटिबध्द : पालकमंत्री शंभूराज देसाई यांचे आश्वासनं

**सातारा :** सैन्यदल, माजी सैनिक, शहिदांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी राज्य शासन सदैव कटिबध्द आहे. ज्या शहिदांच्या परिवारांना अद्यापही जागा मिळाली नाही त्यांच्या जागेचा प्रश्न येत्या २७ ऑगस्ट या शहिद गजानन मोरे यांच्या हौतात्म दिनाच्या पुर्वी मार्गी लावू, या विषयासाठी मंत्रालय स्तरावर आढावा घेऊ व या परिवारांना लवकरात लवकर जागा मिळवून देण्यासाठी कसोशिने प्रयत्न करु, अशी ग्वाही पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिली.



सैनिक कल्याण विभागातर्फे २५ वा कारगिल विजय दिवस सातारा येथे जिल्हा परिषदेच्या स्वर्गीय यशवंतराव चव्हाण बहुउद्देशिय सभागृहात पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सैनिक कल्याण विभागाचे राज्याचे संचालक ब्रिगेडियर (निवृत्त) राजेश गायकवाड, भारतीय सेना दलाचे निवृत्त जनरल विजय पवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, सैनिक कल्याण विभागाचे उपसंचालक (ले.क. निवृत्त) आर. आर. जाधव, कर्नल सतीश हंगे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी पुणे, लेफ्टनंट कर्नल भीमसेन चवदार जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सांगली, मेजर आनंद पाथरकर सेना मेडल जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सातारा, माजी उपनगराध्यक्ष शंकर माळवदे, यांची प्रमुख उपस्थिती होती. कारगिल युध्दातील राज्यातील हुतात्म्यांच्या वारसांचा, युध्दात अपगंत्व आलेल्यांचा तसेच शौर्यपदक प्राप्त अधिकारी व जवानांचा यावेळी पालकमंत्री देसाई यांच्या हस्ते धनादेश, स्मृतीचिन्ह व शाल देवून गौरव करण्यात आला.

पालकमंत्री शंभूराज देसाई म्हणाले, सातारा जिल्हा हा सैनिकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. देशाची सेवा करत असताना अनेकांनी हौतात्म पत्करले, अंपगत्व पत्करले आहे. आपले जवान छातीचा कोट करुन परकीय शक्तीची आक्रमणे परतवून लावत असतात. वर्दीधारी जवान, दिवस रात्र देशांच्या सिमांचे रक्षण करत असतात. त्यामुळेच आपण देशबांधव सुरक्षित राहतो. यावेळी पालकमंत्री देसाई यांनी येणाऱ्या १५ ऑगस्ट पासून वॉर मेमोरियलला १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व १ मे या दिवशी अभिवादन करण्याची प्रथा जिल्ह्यात सुरु करणार असल्याची ग्वाही यावेळी त्यांनी दिली.

या कार्यक्रमास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे येणे नियोजित होते. तथापि दिल्ली येथे महत्त्वाची बैठक असल्याने आणि खराब हवामानामुळे कराड येथे विमान उतरण्यात अडथळा निर्माण होईल असे यंत्रणेकडून सांगण्यात आल्याने त्यांना या ठिकाणी येता आले नाही.

यावेळी सैनिक कल्याण विभागाचे संचालक राजेश गायकवाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कारगिल युध्दाने देशाला शौर्याची एक नवीन गाथा दिली, या युध्दात अनेक वीर जवानांनी आहुती दिली. कार्यक्रमापुर्वी पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी शहिद कर्नल संतोष महाडिक यांना स्मृतीउद्यानात पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. या कार्यक्रमात वीरमाता कालिंदी महाडिक, वीरपत्नी उज्वला निकम, वीरपत्नी विद्या सानप यांनी मनोगत व्यक्त केले. आभार आर. आर. जाधव यांनी मानले.

# सुलेवाडी येथील डोंगराला मोठमोठ्या भेगा

## डोंगर पायथ्याच्या रांजणी गावातील नागरिक भीतीच्या छायेत

**वाई :** डोंगरमाथ्यावर वसलेल्या जावळी तालुक्यातील घोटेघर आणि सुलेवाडी येथील डोंगराला मोठमोठ्या भेगा पडून भुस्कलनामुळे हा डोंगर पायथ्याशी असणाऱ्या रांजणी गावावर कोसळण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे माळीणसारखी परिस्थिती निर्माण झाल्याने रांजणी व सुलेवाडीचे ग्रामस्थ जीव मुठीत घेऊन मुसळधार पावसात जीवन कंठीत आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी की जावळी तालुक्यात मुसळधार पाऊस कोसळत असून डोंगरमाथ्यावरील घोटेघर येथील सुमारे २०० ते २५० लोकवस्तीच्या सुलेवाडी वस्तीच्या खालच्या बाजूस असणाऱ्या सुमारे २० ते २५ एकर क्षेत्राच्या शेतजमीन व डोंगर उताराला मोठमोठाल्या दीड कीमी लांब व एक ते दीड फूट रुंद अशा भेगा पडल्या आहेत पाऊस बेफाम कोसळत असल्याने या भेंगांमध्ये पाणी जाऊन त्या वाढू लागल्या आहेत त्यामुळे भूस्खलन होऊन हा अख्खा डोंगर पायथ्याशी असणाऱ्या रांजणी गावावर जाणार आहे त्यामुळे रांजणीचे ग्रामस्थ भयभित झाले आहेत. तर सुलेवाडीकर लोकवस्ती भेदरून गेली आहे.



# जिल्ह्यात दोन महिन्यांत १२४ जणांना डेंग्यू

**सातारा :** पावसाळा सुरू झाल्यापासून सातारा जिल्ह्यात डेंग्यू, मलेरिया बाधित रुग्णांच्या संख्येत वाढ होऊ लागली आहे. आरोग्य विभागाच्या नोंदीनुसार जून व जुलै या दोन महिन्यांत जिल्ह्यात डेंग्यूचे १२४ रुग्ण आढळून आले आहेत. जिल्हा आरोग्य व हिवताप विभागाकडून डेंग्यू प्रतिबंधासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. मात्र, नागरिकांनीदेखील आपल्या सुरक्षेची पुरेपूर काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलिपे व जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. राजेंद्र जाधव यांनी केले आहे.

**या उपाययोजना करा**

* घर व परिसरात पाणी साचू देऊ नका. घरातील पाण्याचे सर्व साठे आठवड्यातून एकदा रिकामे करून घासून पुसून कोरडे करा.

* घराजवळ पडलेले खड्डे बुजवा. जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच उपकेंद्र येथून गप्पी मासे घेऊन हौद, सिमेंटच्या टाक्या, विहिरी, तळे, शेततळ्यात सोडा.

*झोपताना पूर्ण अंगभर कपडे घाला, मच्छरदाणीचा वापर करावा. संध्याकाळी ६ ते ८ या दरम्यान दारे खिडक्या बंद करा. खिडक्यांना जाळ्या बसवा.

* घराच्या छतावरील फुटके डबे, टायर्स, भंगार आदींची विल्हेवाट लावा. दर आठवड्याला नाल्यात जळके ऑइल टाका.

* घरामध्ये ठेवलेल्या फ्रिजच्या पाठीमागील बाजूस ट्रेमध्ये पाणी साठते. त्यामध्ये सुद्धा डेंग्यू, चिकुनगुनिया, मलेरिया यासारख्या आजारांच्या डासांची निर्मिती होते. दर आठ दिवसांनी हे भांडे स्वच्छ करा.

**मोफत उपचार**

डेंग्यू ताप आजाराची तपासणी व उपचार प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालयात मोफत उपलब्ध आहेत. त्यामुळे नागरिकांनी ताप, अंगदुखी, सांधेदुखी, थकवा अशी लक्षणे असल्यास रुग्णालयात तातडीने उपचार घ्यावेत, असे आवाहनही आरोग्य विभागाने केले आहे.

डास निर्मूलनासाठी आरोग्य व हिवताप विभागाचे सातत्याने प्रयत्न सुरू असतात. कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असूनही गृहभेटीद्वारे नागरिकांची आरोग्य तपासणी करणे, डेंग्यूच्या अळ्या शोधून त्या नष्ट करणे, रक्त संकलन अशी कामे कर्मचारी करत असतात. डेंग्यूच्या अळ्या प्रामुख्याने नागरिकांच्या घरातच आढळून येतात. असे असताना नागरिक स्वतःच्या सुरक्षेची कोणतीही काळजी घेताना दिसत नाहीत.